नि.दि.दा.क्र ९६/२०२०
नि.क्र. १७अ व नि. १९अ

**नियमित दिवाणी दावा क्र. ९६/२०२०**
**चातुराबाई सरगर विरुद्ध आप्पा हाक्के व इतर**

## नि. क्र. १७अ व नि. १९अ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ आप्पा तातोबा हाक्के हे दिनांक ०७/०८/२०२१ रोजी मयत झाल्याने, मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मयत प्रतिवादी चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. १ आप्पा तातोबा हाक्के हे दिनांक ०७/०८/२०२१ रोजी मयत झालेले असुन प्रतिवादींचे वारस ९० दिवसांच्या आत अभिलेखावर घेणे कायदयाने अपेक्षित होते. परंतु, ते मयत झाल्यानंतर त्यांचे मयताचे दाखले गोळा करुन, त्यांची वारसांची माहिती घेवून वेळेत मयताचे वारस रेकॉर्डवर घेता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा वादीने जाणुनबुजून केलेला नसुन उपरोक्त नमूद कारणांमुळे झालेला आहे. सबब, वादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी नि. २३ वर आपले म्हणणे दाखल केले असून त्यांनी सदरच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांचे म्हणणे की, प्रतिवादी क्र. १ हे मयत होवून २० महिन्याहून अधिक काळ झाला आहे. वादी यांनी त्यांचे अर्जात वारस रेकॉर्डवर आणणेसाठी नेमका किती दिवसांचा, महिन्यांचा

विलंब झालेला आहे याचा स्पष्ट उल्लेख अथवा खुलासा केलेला नाही. वादींनी विलंबाबातचे कथन मोघमपणे केलेले आहे. सबब सदरचा अर्ज फेटाळण्याची व जास्तीत जास्त दंड करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तूत दाव्यामध्ये मयत प्रतिवादी क्र. १ आप्पा तातोबा हाक्के चे अर्जामध्ये नमुद वारस वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचे कक्षामध्ये यापूर्वी पासूनच समाविष्ट असल्यामुळे प्रस्तूतचा दावा मयत प्रतिवादी विरुध्द अबेट होत नाही. सदर प्रतिवादींनी निशाणी २३ वर म्हणणे दाखल केले असून त्यांचे म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ दि. ०७/०८/२०२१ रोजी मयत झाले असून प्रस्तूत अर्ज २० महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. वादीने अर्जामध्ये नमूद केलेली कारणे मोघम स्वरुपाची असून प्रस्तूत अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मयताचे दाखले गोळा करन त्यांची वारसाची माहिती घेवून मुदतीत मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्याकामी विलंब झालेला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व डिक्लरेशन व कब्जासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सदरच्या दाव्यात वादी–प्रतिवादीचे स्थावर मिळकतीबाबतचे हक्क व अधिकारांशी निगडीत आहे. वादींनी जरी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १चे वारस नव्याने समाविष्ट करावा असा दिलेला असला तरी अभिलेखवरील प्रत विचारात घेता मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस वादी व प्रतिवादी क्र. ३,५ व ६ यांचे कक्षामध्ये या पूर्वीच समाविष्ट असल्याने प्रस्तूत नव्याने त्यांना समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही. सबब केवळ मयत प्रतिवादी क्र. १ च्या नावापूढे मयत असे लिहून त्यांचे वारस वादी

व प्रतिवादी क्र. ३ ते ६ असे दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येत आहे. प्रतिवादी क्र. १ हे दि. ०७/०८/२०२१ रोजी मयत झाले असून प्रस्तूतचा अर्ज दि. ०२.०३.२०२३ रोजी दाखल केलेला आहे. सदर झालेला विलंबाबाबत अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. ३, ५ व ६ यांना रक्कम रुपये ५००/– खर्च अदा करणे न्यायोचित होईल.

५. सबब, प्रस्तुतचा दावा गुणदोशावर निकाली काढण्याकामी मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर असणे अत्यंत आवश्यक आहे. सबब खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. १७अ व १९अ मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब या आदेशाद्वारे माफ करण्यात येत आहे.

३. वादीने प्रस्तूत अर्जाचे खर्चाची रक्कम रुपये ५००/– प्रतिवादी क्र. ३,५ व ६ यांना अदा करावी.

४. वादीने आवश्यक ती दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्त प्रत विहीत मुदतीमध्ये सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.10.27 17:02:01 +0530

**कवठेमहांकाळ** **(एम.ए.कुलकर्णी)**

**दिनांकः– २७/१०/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कवठेमहांकाळ**

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | J. A. Salunkhe |
| Court | : | Jt. CJJD and JMFC, |
| Kavathemahankal. | | |
| Date | : | 27.10.2025 |
| Order signed by P.O. on | : | 27.10.2025 |
| Order uploaded on | : | 27.10.2025 |